प्रबोधन
गोरेगाव

# पंधरावा वार्षिक अहवाल

१९८६-८७

# प्रबोधन गोरेगाव

## १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

प्रबोधन गोरेगाव या संस्थेची १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक ५ मार्च १९८८ रोजी रात्रौ ९ वाजता गणपती भुवन, महात्मा गांधी मार्ग, गोरेगाव (प.), मुंबई-६२ येथील संस्था कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. या सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील कामकाज :**

१. प्रास्ताविक

२. सन १९८६-८७ चा वार्षिक अहवाल, आयव्यय पत्रक व ताळेबंद (हिशेब तपासनीसांच्या अहवालासह) वाचून मंजूर करणे.

३. नवीन वर्षाकरिता (१९८७-८८) घटनेच्या कलम ७ इ प्रमाणे अध्यक्ष (१ जागा) उपाध्यक्ष (२ जागा) व कार्यकारी मंडळावरील निवृत्त झालेल्या ३ सभासदांच्या जागी नवीन सभासदांची निवड करणे. (एकूण ६ जागा)

४. नवीन वर्षाकरिता अंतर्गत हिशेब तपासनीस व सरकारमान्य हिशब तपासनीस यांची नेमणूक करणे.

५. अध्यक्षांचे अनुमतीने सभेपुढे येणारी कामे.

कार्यकारी मंडळाच्या आज्ञेवरुन

**गिरीश देसाई**
कार्याध्यक्ष

गोरेगाव, मुंबई–६२

**डॉ. मनोहर अद्वानकर**
प्रमुख कार्यवाह

---

१) संस्थेचा जमाखर्च सभासदांच्या अवलोकनार्थ गणपती भुवन, लो. टिळक नगर रस्ता क्र. ३, गोरेगाव (प) येथील संस्थेच्या कार्यालयात दि. १–३–१९८८ व २–३–१९८८ पर्यंत रोज रात्रौ ८ ते ९ पर्यंत ठेवण्यात येईल.

२) कोणाही सभासदास त्या बाबतीत काही सूचना करावयाच्या असल्यास त्या दिनांक ३–३–१९८८ पूर्वी कार्याध्यक्षांकडे लेखी सादर कराव्यात.

३) गणसंख्येच्या अभावी वरील सभा तहकूब झाल्यास, तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासनंतर घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

४) निवडणूकीस उभे राहू इच्छिणाऱ्या सभासदांनी आपले अर्ज दि. ३–३–१९८८ पूर्वी संस्था कार्यालयात रात्रौ ८ ते ९ या वेळेत आणून द्यावेत. अर्जांचा नमूना याच ठिकाणी उपलब्ध आहे.

# ‘प्रबोधन – गोरेगाव’

## १५ वा वार्षिक अहवाल १९८६ - ८७

‘प्रबोधन-गोरेगाव’ या संस्थेच्या कार्याचा दि. १ जुलै १९८६ ते ३० जून १९८७ पर्यंतच्या पंधराव्या वर्षाचा अहवाल व हिशोब पत्रके संस्थेच्या सर्व सन्माननीय सभासदांना सादर करताना कार्यकारी मंडळास विशेष आनंद होत आहे.

### कार्यकारी मंडळ आणि सभा :

या अहवाल वर्षात कार्यकारी मंडळाच्या एकूण १२ सभा घेण्यात आल्या. या सभांना सभासदांची एकूण उपस्थिती १२ होती. या वर्षाच्या कार्यकारी मंडळाची सभासद संख्या स्वीकृत सभासदांसह एकूण १७ होती.

### प्रबोधन वक्तृत्व स्पर्धा (वर्ष १५ वे)

दूरदर्शनवरील प्रायोजित कार्यक्रमात :भरीव वाढ: झालेली असल्याने, विद्यार्थ्यांचे लक्ष अभ्यासावर केंद्रित होत नाही, अशी ओरड सर्वत्र होत असतांना, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी कलागुणांत मागे नाहीत व विद्यार्थी ते कलागुण प्रगट करण्याची संधी सोडत नाहीत, हे दर्शविण्यासाठी प्रबोधन वक्तृत्व स्पर्धेस मिळणारा भरघोस प्रतिसाद पुरेसा बोलका आहे. यंदाच्या १४ व्या वर्षी सातत्याने घेण्यात आलेल्या या स्पर्धेस मुंबई–ठाण्याबाहेरील अनेक शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग लाभला होता व त्यामुळेच या स्पर्धेस अखिल महाराष्ट्र पातळीवरील स्पर्धेचे स्वरुप आले होते. पालक, शिक्षक, विद्यार्थी: व इतर हितचिंतकांच्या उपस्थितीत या स्पर्धा दि. १४ सप्टेंबर १९८६ रोजी पाटकर महाविद्यालय, गोरेगाव येथे अत्यंत शिस्तबद्ध वातावरणात पार पडल्या.

या स्पर्धेचा बक्षिस समारंभ त्याचदिवशी संस्थेचे एक संस्थापक व प्रमुख आधारस्तंभ, शिवसेना नेते श्री. सुभाष देसाई यांच्या हस्ते पार पडला. त्याप्रसंगी विजेत्या स्पर्धकांना रोख बक्षिसे व प्रमाणपत्रे देण्यात आली तर विजेत्या स्पर्धक संघास फिरता करंडक देण्यात आला. शालेय गटाच्या स्पर्धेचे परीक्षण सौ. स्वाती तोरसेकर व प्राध्यापक जयंत राईलकर यांनी तर महाविद्यालयीन गटाच्या स्पर्धेचे परीक्षण श्री. भाऊ तोरसेकर व सौ. आशा गाडगीळ यांनी केले.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे :

**शालेय गट :**

### शिक्षण महर्षि कै. दादासाहेब रेगे स्मृति प्रबोधन फिरता करंडक :

सांघिक विजेती शाळा : वामनराव मुरांजन माध्यमिक विद्यालय, मुलुंड. भाग घेणारे विद्यार्थी - १) गिरीश कापसीकर २) संदिप भातखंडे ३) स्वाती राजवाडे

### घोषित विषयावरील स्पर्धा :

**प्रथम पारितोषिक :- रोख रु. १५०/–**

गिरीश कापसीकर, वामनराव मुरांजन माध्यमिक विद्यालय, मुलुंड.

**द्वितीय पारितोषिक :- रोख रु. १००/-(विभागून)**

संदिप भातखंडे, वामनराव मुरांजन माध्यमिक विद्यालय, मुलुंड.

कु. मधुवंती आगाशे, पार्ले टिळक विद्यालय, विलेपार्ले.

**तृतीय पारितोषिक :– रोख रु. ५०/–**

कु. विद्यागौरी महाजन, जनता विद्यालय, खोपोली.

### उत्स्फूर्त भाषण स्पर्धा :

प्रथम पारितोषिक :- रोख रु. ५०/–

मनीष मोहिले, टिळक नगर विद्यामंदिर, डोंबिवली,

द्वितीय पारितोषिक :- रोख रु. २५/–

सीमा पंडित, पार्ले टिळक विद्यालय, विलेपार्ले.

## महाविद्यालयीन गट :

**कै. जगदिश गोविंदराव कुलकर्णी स्मृति फिरता प्रबोधन करंडक :**

सांघिक विजेते महाविद्यालय : राम नारायण रुईया महाविद्यालय.

भाग घेणारे विद्यार्थी : १) अनंत गुरव २) कल्याणी विलणकर ३) योगेश लोहोकरे

## घोषित विषयांवरील स्पर्धा :

प्रथम पारितोषिक रोख रु. २००/-

कु. गीता फणसे, मुलुंड वाणिज्य महाविद्यालय, मुलुंड

द्वितीय पारितोषिक रोख रु. १५०/-

कु. गौरी गोगटे, डहाणूकर वाणिज्य महाविद्यालय विलेपार्ले

तृतीय पारितोषिक रोख रु. १००/-

कु. माया मेंहंदळे, सी. एच. एम. महाविद्यालय, उल्हासनगर.

## उत्स्फूर्त भाषण स्पर्धा :

प्रथम पारितोषिक रोख रु. १००/-

योगेश लोहोकरे, रामनारायण रुईया कॉलेज, माटुंगा.

द्वितीय पारितोषिक रोख रु. ७५/-

सच्चिदानंद रानडे, श्री. विनायक कॉलेज, अंधेरी.

## प्रबोधन आंतर शालेय क्रीडा महोत्सव वर्ष ९ वे

'प्रबोधन' ने क्रीडाक्षेत्रात पदार्पण केले व अल्पावधीतच स्वतःच्या कर्तृत्वाचा ठसा क्रीडाक्षेत्रात उमटविला, हे नमूद करण्यास संस्थेस अत्यानंद होत आहे. अर्थात हे यश संस्थेच्या त्या असंख्य कार्यकर्त्यांचे आहे, जे तहानभूक व घरदार विसरुन क्रीडा महोत्सव यशस्वी करण्यासाठी कित्येक दिवस अक्षरशः राबत असतात. संस्थेस सेवाभावी कार्यकर्त्यांची उणीव कधीही जाणवली नाही व यापुढेही ती कधी जाणवणार नाही याबद्दल आमच्या मनात संदेह नाही. ऑलिम्पिक किंवा तत्सम जागतिक क्रीडास्पर्धांत भारतासारख्या आपल्या अफाट लोकसंख्येच्या देशास एकही सुवर्णपदक मिळवता येऊ नये, ही खंत सर्व क्रीडाप्रेमींना एकत्र आणण्यास कारणीभूत होते.

आपले विद्यार्थी क्रीडागुणांत कमी नाहीत, कमी पडते ते मार्गदर्शन व सुविधा. त्यासाठी जरुरी आहे ती अथक परिश्रमांची, योग्य मार्गदर्शनाची त्याचप्रमाणे त्यासाठी लागणाऱ्या योग्य सराव केंद्राची, याची संस्थेला जाणीव आहे, म्हणूनच संस्थेने क्रीडासंकुल गोरेगाव येथे उभारण्याची घोषणा केली आहे. ती योजना आजवर साकार झाली नाही तरी, आज ना उद्या ती योजना साकार झाल्यशिवाय रहाणार नाही याबद्दल आमच्या मनात तिळमात्रही संदेह नाही.

यंदाचा ९वा क्रीडा महोत्सव दि. १९ ते २१ डिसेंबर १९८६ या कालावधीत सिद्धार्थनगर पटांगण गोरेगाव (पश्चिम) येथे अत्यंत शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. दि. १९ डिसेंबर १९८६ रोजी या क्रीडामहोत्सवाचे उद्‌घाटन मुंबईचे महापौर **श्री. दत्ताजीराव नलावडे** यांच्या शुभहस्ते झाले. त्या प्रसंगी झालेल्या विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध संचलनास मुंबई अग्निशमन दलाच्या वाद्यवृंदाची साथ लाभली होती. संचलनाची मानवंदना महापौरांनी स्विकारल्यानंतर गतवर्षीच्या क्रीडामहोत्सवात सर्वोत्कृष्ट क्रीडापटू ठरलेली मेरी इम्मॅक्युलेट गर्ल्स् हायस्कूल, बोरिवली या शाळेच्या कु. नंदिता सुवर्णा या विद्यार्थिनीच्या हस्ते क्रीडाज्योत प्रज्वलीत करण्यात आली. त्यानंतर झेंडावंदन झाल्यावर सर्व खेळाडूंना श्री. वायरन बॉझ यांनी शपथ दिली. सतत तीन दिवस चाललेल्या या क्रीडा महोत्सवात वांद्रे ते दहिसर या पश्चिम उपनगरातील ५५ शाळांतील २००० हून अधिक क्रीडापटूंना आपले नैपुण्य दाखविण्याची संधी मिळाली. या क्रीडामहोत्सवास " रिलायन्स " 'जिनदत्तसुरी' या उद्योगसमुहांचा व 'गोरेगाव स्पोर्टस् क्लब' यांचा पुरस्कार लाभला होता. रविवार दि. २१ डिसेंबर १९८६ रोजी गोरेगाव स्पोर्टस

क्लबचे अध्यक्ष व संस्थेचे उपाध्यक्ष श्री. प्रभाकर मोडक यांनी खेळाडूंची मानवंदना स्वीकारली व सोहळ्याची सांगता झाल्याचे घोषित केले. सांगता समारंभानंतर मैदानातच प्रकाशझोतात झालेल्या लोकनृत्याच्या स्पर्धांनी समारंभास खरीखुरी रंगत आणली. त्यानंतर श्री. प्रभाकर मोडक यांच्याहस्ते विजयी स्पर्धक संघांना करंडक देण्यात आले. या क्रीडामहोत्सवातील धावणे, उंच उडी, लांब उडी, भाला फेक, गोळा फेक या एकूण ३५ प्रकारच्या वैयक्तिक क्रीडास्पर्धांत ८०० हून अधिक खेळडूंनी भाग घेतला होता. खो-खो, कबड्डी यासारख्या सांघिक सामन्यांत मुलामुलींच्या एकूण ६९ संघांनी भाग घेतला होता, तर सांघीक कवायतीत २० व लोकनृत्यांच्या स्पर्धेत ८ संघांनी भाग घेतला होता. प्रतिवर्षाप्रमाणेच यावर्षीही क्रीडामहर्षि श्री. यशवंतराव गोळे यांचे मार्गदर्शन क्रीडामहोत्सवास लाभले.

## स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे :

सर्वोत्कृष्ट संघासाठी असलेला **'प्रबोधन फिरता करंडक'** : परांजपे विद्यालय, अंधेरी.

कबड्डी (मुले) ५७ किलो वजन गट

विजेता संघ–बी. पी. एम्. हायस्कूल, खार.
उपविजेता संघ–महात्मा गांधी विद्यालय, वांद्रे.

कबड्डी (मुली) ४५ किलो वजन गट

विजेता संघ–आर. व्ही. टेक्निकल हायस्कूल, खार.
उपविजेता संघ–नंदादीप विद्यालय

खो-खो ( मुले १७ वर्षाखालील )

विजेता संघ–विद्यामंदिर, दहिसर.
उपविजेता संघ–परांजपे विद्यालय, अंधेरी.

खो-खो मुली ( १६ वर्षाखालील )

विजेता संघ–परांजपे विद्यालय, अंधेरी.
उपविजेता संघ-आय. ई. एस्. न्यू इंग्लिश हायस्कूल, वांद्रे

लोकनृत्य स्पर्धा –

विजेता संघ–कुलदिपसिंग दिवाण हायस्कूल, गोरेगाव.
उपविजेता संघ–विद्या विकास विद्यालय, अंधेरी

संचलन स्पर्धा –

विजेता संघ–मेरी इम्मॅक्युलेट हायस्कूल, बोरीवली
उपविजेता संघ–सेन्ट थॉमस हायस्कूल, गोरेगाव

ॲथलेटिक्स् स्पर्धा –

विजेता संघ–सेन्ट थॉमस ॲकॅडमी, गोरेगाव
उपविजेता संघ-श्रीमती जयाबेन खोत हायस्कूल बोरीवली

## पंधरावा वर्धापन दिन समारंभ मार्मिक प्रबोधन विनोदी कथा स्पर्धा बक्षिस समारंभ व करमणूक कार्यक्रम :

संस्थेस १५ वे वर्ष संपून आता सोळावे वर्ष लागले, म्हणजे संस्थेने यौवनातच पदार्पण केले आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये. यंदाच्या वर्षीचा वर्धापन-दिन समारंभ रविवार दि. २९ मार्च १९८७ रोजी पाटकर महाविद्यालय, गोरेगाव येथील पटांगणात मोठ्या थाटात पार पडला. त्याप्रसंगी झालेल्या समारंभाचे अध्यक्षस्थान निष्णात हृदयरोग तज्ञ डॉ. वसंतराव चव्हाण यांनी भूषविले होते. मार्मिक-प्रबोधन विनोदी कथा स्पर्धेच्या मानकऱ्यांस त्यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली व गोरेगाव येथील मराठी माध्यमांच्या शाळांतून शालांत परिक्षेत सर्व प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा त्याचप्रमाणे इतर विषयात शालांत परिक्षेत सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना अध्यक्षांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांना रोख पारितोषिके देण्यात आली.

या वर्धापनदिनाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याप्रसंगी सादर करण्यात आलेले अनेक विविधरंगी कार्यक्रम. कु. मुग्धा चिटणीस ह्यांच्या कथाकथनाने श्रोते मंत्रमुग्ध होऊन गेले तर सिनेतारका कु. अर्चना जोगळेकर ह्यांनी सादर केलेल्या कथ्थक नृत्याने व अन्य अनेकविध करमणूक कार्यक्रमाने सर्व उपस्थितांचे मनोरंजन केले. त्यानंतर सादर झालेल्या उदय उपाध्ये, राजाभाऊ उपाध्ये व साथीदारांनी सादर केलेल्या सुगम संगीताच्या कार्य-क्रमाने तर सर्व श्रोत्यांना एका वेगळ्याच भावविश्वात नेऊन सोडले.

यंदाच्या वर्षापासून संस्थेने 'मार्मिक' साप्ताहिकाच्या सहकार्याने वाङ्मय क्षेत्रात प्रवेश केला व संस्थेने घोषित केलेल्या 'मार्मिक–प्रबोधन विनोदी लेखन स्पर्धेस अखिल महाराष्ट्रातून भरघोस प्रतिसाद मिळाला. त्या स्पर्धेतील बक्षिसपात्र कथा 'मार्मिक'च्या १९८६ च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या.

## एकांकिका महोत्सव :

संस्थेच्या स्थापनेपासून संस्थेने एकांकिका स्पर्धांचे आयोजन करुन नाट्यक्षेत्रात प्रवेश केला होता. १५ वर्षांपूर्वी जेव्हा संस्थेने एकांकिका स्पर्धेच्या आयोजनास सुरुवात केली तेव्हा मुंबईत अशा तऱ्हेच्या अवघ्या तीनच स्पर्धा भरविण्यात येत असत. सध्या या स्पर्धांची व्याप्ती व आवाका खूपच मोठा झाला आहे. सध्या संपूर्ण महाराष्ट्रात अशा तऱ्हेच्या १०० हून अधिक स्पर्धा भरविण्यात येतात. दुर्लक्षित अशा रंगभूमीस जिवंत ठेवण्याचे कार्य एकांकिकेने पार पाडले आहे एकांकिकेचा आकार लहान पण त्यात थोडक्या वेळात प्रगट होणारा आशय खूपच मोठा, म्हणूनच एकांकिकेस 'मराठी रंगभूमिची प्रयोगशाळा' म्हणतात. अशा या एकांकिका स्पर्धा सातत्याने गेली चौदा वर्षे आयोजित करुन 'प्रबोधन' ने तिच्यातून वावरणाऱ्या संस्था आणि नाट्यप्रेमींशी जिव्हाळ्याचे नाते जोडले आहे. म्हणूनच संस्थेने यंदाच्या पंधराव्या वर्षी मागे वळून पाहण्याचे, आजच्या स्थितीची चाचपणी करण्याचे त्याचप्रमाणे मुंबई महानगर परिसरातील शेकडो नाट्य संस्थांतून क्रियाशील असणाऱ्या हजारो कलाकारांना दिग्दर्शकांना, तंत्रज्ञांना, लेखकांना आणि एकांकिकेवर प्रेम करणाऱ्या अमर्याद नाट्यरसिकांना एकत्र आणण्याचे ठरविले आणि त्यातूनच 'प्रबोधन एकांकिका उत्सव' साकार झाला.

'प्रबोधन एकांकिका उत्सव' १ मे ते ४ मे १९८७ या काळात अ. भि. गोरेगावकर शाळेच्या पटांगणावर उभारण्यात आलेल्या अरविंद देशपांडे खुल्या नाट्य-मंदिरात पार पडला सुभाष देसाई यांच्या कल्पक संयोजनाने भरविण्यात आलेल्या या उत्सवात एकूण १५ नव्याजुन्या एकांकिका सादर करण्यात आल्या. या उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे, मिरज येथील नाट्यगृहाच्या प्रतिकृतीत भरविण्यात आलेले रंगमंच साहित्याचे, व जुन्यानव्या नाट्यक्षेत्रातील साहित्यिकांच्या दुर्मिळ छायाचित्रांचे प्रदर्शन.

या उत्सवात प्रत्येक एकांकिका सादर झाल्यानंतर त्या एकांकिकेच्या लेखकांशी, दिग्दर्शकांशी प्रेक्षकांना साधता येणारा सुसंवाद किंवा चर्चासत्र हे आगळे वैशिष्ट्य ठरले.

या उत्सवाचा उद्घाटन समारंभ दि. १ मे १९८७ रोजी 'मुंबई सकाळ'चे संपादक श्री. **आत्माराम सावंत** यांच्या हस्ते पार पडला. या उत्सवाच्या सांगता समारंभास मराठी नाट्यपरिषदेच्या अध्यक्षा श्रीमती **विजया मेहता** विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या. त्याप्रसंगी उत्सवाच्या निमित्ताने तयार केलेल्या अत्यंत माहितीपूर्ण व संग्राह्य 'एकांकिका उत्सव १९८७' या स्मरणिकेचे प्रकाशन माननीय विजयाबाईंच्या हस्ते करण्यात आले व उत्सवात सादर केल्या गेलेल्या सर्व एकांकिकांच्या सादरकर्त्या संस्था व त्याचप्रमाणे या उत्सवात विशेष हातभार लावणाऱ्या कार्यकर्त्यांना तंत्रज्ञांना सन्मानचिन्हे प्रदान करण्यात आली.

या उत्सवासाठी शिवसेनाप्रमुख **श्री. बाळासाहेब ठाकरे** यांनी रु. १०,०००/– ची देणगी देऊन संस्थेवरील प्रेम पुन्हा एकदा प्रगट केले आहे, हे नमुद, करतांना संस्थेस अत्यानंद होत आहे.

## प्रबोधन बालवाचनालय :

संस्थेच्या रचनात्मक कार्याचा एक भाग म्हणून संस्थेतर्फे चालविण्यात येणाऱ्या बालवाचनालयात उत्तमोत्तम व संस्कारक्षम अशा ३००० हून अधिक पुस्तकांचा समावेश आहे. या बालवाचनालयाचा लाभ होणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांची संख्या दरवर्षी वाढतीच राहीली आहे.

## प्रबोधन बालवाडी :

संस्थेच्या रचनात्मक कार्यांचा भाग असलेल्या व समाजातील आर्थिक दृष्ट्या मागास असणाऱ्या घटकांना उपयुक्त ठरलेल्या अशा या बालवाड्या संस्थेतर्फे जवाहर नगर झोपडपट्टी व तीन डोंगरी झोपडपट्टी येथे विनामूल्य चालविण्यात येतात. या दोन्ही बालवाड्यात १०० बालकांना पूर्व प्राथमिक स्वरुपाचे शास्त्रशुद्ध शिक्षण देण्यात येते व बालवाडीतर्फे दिल्या जाणाऱ्या दाखल्यावर कोणत्याही सरकामान्य शाळेत प्रवेश मिळू शकतो.

## शालांत परीक्षा व्याख्यानमाला ( वर्ष १५ वे )

यंदाची शालांत परीक्षा व्याख्यानमाला फेब्रुवारी १९८७ या महिन्यांत नंदादीप विद्यालयाच्या आवारात अत्यंत शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. या व्याख्यानमालेचा फायदा गोरेगावातील हजारो विद्यार्थी विद्यार्थीनींनी घेतला. ह्या व्याख्यानमालेसाठी अरविंद गंडभीर हायस्कूल जोगेश्वरी, चे सेवाभावी शिक्षक व प्रबोधन संस्थेचे हितचिंतक माननीय **श्री. बाळासाहेब नागवेकर** यांचे विशेष सहाय्य लाभले होते हे नमूद करणे अत्यावश्यक आहे.

## सुलभ आयुर्वेद अभ्यासवर्ग :

संस्थेतर्फे स्त्रियांसाठी 'सुलभ आयुर्वेदा' चे अभ्यासवर्ग पाटकर महाविद्यालयात आयोजित करण्यात आले होते. सलग चार रविवारी प्रत्येकी दोन तास याप्रमाणे एकूण आठ तासामध्ये, वैद्य सौ. जयश्री नांदगावकर यांच्या निष्णात मार्गदर्शनाखाली स्त्रियांना आयुर्वेदाची माहिती, ऋतु प्रमाणे सर्वसाधारण येणारे आजार व त्यावरील उपयुक्त घरगुती औषधोपचारांची माहिती देण्यात आली. अभ्यासवर्गाच्या काळात औषधी वनस्पतींच्या नमुन्याचे व आयुर्वेदावरील पुस्तकांचे प्रदर्शन आयोजिण्यात आले होते. या अभ्यासवर्गाचा लाभ अंदाजे १०० स्त्रियांनी घेतला व प्रबोधनच्या ह्या उपक्रमाचे नुसते कौतुकच केले नाही तर प्रतिवर्षी गोरेगावात निरनिराळ्या भागात या अभ्यास क्रमाचे आयोजन करण्याची मागणीही केली.

## धन्यवाद :

संस्थेच्या प्रत्येक कार्यात हितचिंतकांचा, सभासदांचा व सेवाभावी कार्यकर्त्यांचा सिंहाचा वाटा आहे. पत्रकार मित्र त्याचप्रमाणे इतर सेवाभावी संस्था ह्यांनी केलेल्या सक्रीय सहकार्यामुळेच संस्थेस येथवर वाटचाल करणे शक्य झाले आहे. बृहन्मुंबई महापालिकेने यंदाच्या वर्षी संस्थेस रु. १,००,०००/– चे अनुदान दिले त्या उदार मदतीबद्दल संस्था महापालिकेची व अनुदान समिती– वरील नगरसेवक सदस्यांची अत्यंत ऋणी आहे. त्याचप्रमाणे प्रबोधन क्रीडा महोत्सवासाठी रिलायन्स्, जिनदत्तसुरी या उद्योगसमुहांची व गोरेगाव स्पोर्टस् क्लब या संस्थेची त्यांनी केलेल्या उदार मदतीबद्दल व एकांकिका उत्सवासाठी माननीय शिवसेनाप्रमुख **श्री. बाळासाहेब ठाकरे** यांनी केलेल्या उदार मदतीबद्दल संस्था त्यांची अत्यंत ऋणी आहे. संस्थेचे सरकारमान्य हिशोब तपासनीस मेसर्स एस्. एस्. नायक आणि कं. व अंतर्गत हिशोब तपासनीस श्री. रामचंद्र जोशी यांनी केलेल्या बहुमोल मार्गदर्शन व सहकार्याबद्दल संस्था त्यांची अत्यंत ऋणी आहे.-- ह्यापुढील संस्थेच्या वाटचालीतही सर्वांचा लोभ तसाच कायम राहील असा विश्वास व्यक्त करीत आहोत.

### दुःखद निधन

संस्थेचे सभासद श्री. वसंतराव कोळंबेकर व श्री. वासुदेव कृष्णाजी सेतवडेकर यांचे देहावसान झाले. ईश्वर मृतात्म्यांस शांती देवो. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात प्रबोधन गोरेगावचे कार्यकारी मंडळ सहभागी होत आहे.

कार्यकारी मंडळ

आपले नम्र,

**कार्यकारी मंडळ १९८६–८७**

प्रबोधन गोरेगाव

# प्रबोधन गोरेगाव

संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वये नोंदलेली संस्था [Regn. No. Bom. 46/72 GB BSD]

मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदलेली संस्था [Regn. No. F 2502 Bom.]

(१९८६–८७)

अध्यक्ष : आमदार श्री. निळकंठ ज. सावंत

उपाध्यक्ष : श्री प्रभाकर ज. मोडक डी. एम्.ओ.डी.ओ.ओ.
श्री. विजय महकर्णी बी.ई. (ऑ.) सिव्हील

-: कार्यकारी मंडळ :-

कार्याध्यक्ष : श्री. गिरीश देसाई डी.सी.ई.

प्रमुख कार्यवाह : डॉ. मनोहर अदवानकर एम्.एस्सी. पी.एच्डी,

सहकार्यवाह : श्री. सुरेश चव्हाण बी.ए.
श्री. श्रीनिवास शिरसेकर जी.डी. आर्ट

खजिनदार : श्री दिनकर मालवणकर

-: सभासद :-

श्री. सुभाष देसाई
श्री. वसंत तावडे बी.ए.
श्री. महादेव खानोलकर
श्री. पद्माकर देसाई बी.एस्सी. (ऑ)
श्री. विलास देवरुखकर बी.एस्सी.
श्री. सुरेश सैतवडेकर
श्री दिलीप साळवी बी. एस्सी. (ऑ)
श्री. चंद्रकांत सावंत
श्री. विकास रेळे बी.एड्.एल्.बी.
श्री. नितीन शिंदे
श्री. चंद्रकांत देऊळकर

अंतर्गत हिशेब तपासनीस
श्री. रामचंद्र जोशी सी. ए.

सनदी लेखापाल
मे. एस. एस. नायक आणि कं


कार्यालय :
गणपती भुवन, लो. टिळक नगर मार्ग क्र १
महात्मा गांधी मार्ग गोरेगाव [प],
मुंबई-४०० ०६२.

संपर्क :
रंगसेवा
फिल्मिस्तान जवळ, स्वा. वि. मार्ग
गोरेगाव [प] मुंबई-४०० ०६२.
दूरध्वनी : ६७२ ४१ ५७